**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा परिषद अमरावती**
**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**
**दूरध्वनी क्र. ०७२१-२६६२९२६** Email :-ceozp.amravati@maharashtra.gov.in

क्रमांक — जिप/मुकाअ/स्वीस/ २०२५ दिनांक ०३ जून २०२५.

**जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये, मान्यवरांचे स्वागत करताना *ताज्या फुलांच्या बुके* याऐवजी शालेय साहित्य, ज्ञानवर्धक पुस्तके, फळझाडांची रोपे देण्याची/स्वीकारण्याची नविन पद्धत अंमलात आणण्याबाबत...**

## परिपत्रक

अमरावती जिल्हा परिषदेतंर्गत विविध कार्यालर्याव्दारा अनेकवेळा बैठकांचे आयोजन होत असते. अशा वेळी राजशिष्टाचार म्हणून मान्यवरांचे स्वागत फुलांच्या बुके ऐवजी शालेय साहित्य, ज्ञानवर्धक पुस्तके, फळझाडांची रोपे देण्याची/स्वीकारण्याची नविन पद्धत सुरु करण्याची बाब विचाराधीन होती. त्याअुषंगाने जिल्हा परिषद अमरावती अतंर्गत विविध कार्यालये, पंचायत समिती, तालुका कार्यालये, ग्रामपंचायती इत्यादी व्दारे आयोजित करण्यात येणारे सार्वजनिक / शासकीय समारंभामध्ये मान्यवरांच्या स्वागतासाठी किंवा सन्मानीय लोकप्रतिनिधी, अधिकारी यांचे स्वागतासाठी बुके ऐवजी खालील साहित्य देण्या — घेण्याची पध्दत ठेवावी.

1. शालेय विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी उपयोगी ठरणारे शालेय साहित्य (उदा. वह्या, पेन, पेन्सिल, ड्रॉइंग साहित्य इ.)
2. ज्ञानवर्धक पुस्तके (विशेषतः मुलांसाठी वा वाचनालयासाठी उपयुक्त)
3. फळझाडांची रोपे, (उदा. आंबा, सिताफळ, आवळा, चिंच इ.) फुल रोपे.

ही कृती फक्त स्वागतापुरती मर्यादित नसून सामाजिक जबाबदारी म्हणूनही अंगीकारावी. अशा पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व प्रोत्साहन आणि वृक्षलागवडीला चालना देऊन हरित जिल्हा घडविण्याचा उददेश आहे. सदर परिपत्रक आपले अधिनस्त सर्व यंत्रणांचे निदर्शनास आणावे.

Signed by
Sanjita Mohapatra
Date: 03-06-2025 22:26:09
(संजिता महापात्र, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

क्रमांक — जिप/मुकाअ/स्विस/25/
दिनांक - /05/2025

प्रति,
.........................................सर्व कार्यालये..

जिल्हा परिषद अमरावती.
प्रतिलिपी —वि.का.अ. मा. पालकमंत्री महोदय, अमरावती यांचे कार्यालय यांना माहितीकरीता .